सकाळ दिनांक :- ०८/०७/२१

# दुचाकी चोरणाऱ्या दोघांना अटक

## तीन लाखांच्या नऊ दुचाकी जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नांदेड, ता. ७ (बातमीदार) : गेल्या काही दिवसांपासून दुचाकी चोरीचे प्रमाण वाढल्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेने पथक स्थापन करून शोध सुरू केला असता त्यात दोन दुचाकीचोर सापडले आहेत. त्यांच्याकडील तीन लाख दोन हजार रुपयांच्या चोरलेल्या नऊ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.



**नांदेड : दुचाकीची चोरी करणाऱ्या दोन जणांना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून त्यांच्याकडील नऊ दुचाकीही जप्त करण्यात आल्या आहेत.**

जिल्हा पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी दुचाकी चोरीबाबत कारवाईच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना दिल्या होत्या. त्यानुसार वेगवेगळी पथके तयार करून शोध सुरू करण्यात आला. पथकाला मिळालेल्या माहितीनुसार गुरू रामदास यात्री निवास येथे सापळा रचण्यात आला आणि त्या ठिकाणी बलविरसिंघ प्रतापसिंघ जाधव (रा. गुरू रामदास यात्री निवास, गेट नंबर दोन, नांदेड.) यास दुचाकीसह पकडण्यात आले. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्याने एक लाखाच्या तीन दुचाकी काढून दिल्या. तसेच त्याचा साथीदार आकाश आनंदा बादवड (रा. विठ्ठलनगर, पावडेवाडी, नांदेड) याच्यासोबत दुचाकी चोरी केल्याचे कबूल केले. त्यामुळे आकाश बादवड यालाही पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने गोविंद शर्मा आणि नदील जलील शेख या साथीदारांनी मिळून गुन्हे केल्याची कबुली दिली व दोन लाख दोन हजार रुपयांच्या सहा दुचाकी काढून दिल्या. दुचाकी चोरीबाबत लिंबगावला दोन, वसमतला एक आणि भाग्यनगरला सहा दुचाकी चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्यानुसार संबंधित पोलिस ठाण्यात चोरीच्या दुचाकी देण्यात आल्या आहेत. पोलिस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे, पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार सचिन सोनवणे, सहायक फौजदार गोविंद मुंडे, पोलिस जमादार गुंडेराव करले, पिराजी गायकवाड, संग्राम केंद्रे, पोलिस नायक अफजल पठाण, जिंकलवाड, पोलिस शिपाई विठ्ठल शेळके, गजु बयनवाड, देवा चव्हाण, यादगीरवाड, रवी बाबर, चालक पोलिस नायक अर्जुन शिंदे यांनी ही कामगिरी पार पाडली.